# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 November 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०७ नोव्हेंबर २०२५ दुपारी १.०० वा.

****

वंदे मातरम हा एक मंत्र, एक ऊर्जा, एक स्वप्न आणि एक संकल्प असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राष्ट्रीय गीत वंदे मातरम ला दीडशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आजपासून देशभरात सुरु झालेल्या स्मरणोत्सवाचं उद्घाटन आज नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यावेळी उपस्थित होते.

वंदे मातरम हे गीत म्हणजे भारतमातेची भक्ती आणि आराधना असून, हे गीत आपल्याला इतिहासात परत घेऊन जातं, वर्तमानात आत्मविश्वास जागवतं आणि भविष्यासाठी नवीन धैर्य निर्माण करतं, असं पंतप्रधान म्हणाले. गुलामीच्या त्या काळात 'वंदे मातरम' हे केवळ एक गीत नव्हतं, तो एक संकल्पाचा, भारताच्या स्वातंत्र्याचा, आणि भारतमातेची मुलं स्वतःचं नशीब स्वतः बनवतील, असा उद्घोष होता, असं त्यांनी नमूद केलं. या गीताचा भावार्थ विषद करताना पंतप्रधान म्हणाले,

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

**

वंदे मातरम या गीताला दीडशे वर्षं पूर्ण झाल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या गीताचं स्मरण केलं आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या प्रतिभेतून साकारलेलं हे गीत भारतीयांना एका सूत्रात बांधून ठेवत आलं आहे आणि यापुढेही ठेवेल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**

राष्ट्रीय गीत वंदे मातरम ला दीडशे वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशभरात ठिकठिकाणी या गीताचं सामूहिक गायन करण्यात आलं.

मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातल्या त्रिमूर्ती प्रांगणात 'वंदे मातरम'चं सामूहिक गायन करण्यात आलं. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते.
हिंगोली इथल्या जिल्हा परिषद मैदानावरही या गीताचं गायन करण्यात आलं. यावेळी वंदे मातरम् गीता संदर्भात सखोल माहिती देण्यात आली. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर यांच्यासह शालेय विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.
परभणी शहरात प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलात जिल्हा प्रशासनाच्या वतीनं आज सामूहिक वंदे मातरम गीत गायन करण्यात आलं. यावेळी वंदे मातरम लघु नाटिकाही सादर करण्यात आली. परभणी जिल्हाभरात एकाच वेळी या गीताचं गायन गायन करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

भारतीय बँका गेल्या दशकापूर्वीच्या तुलनेत खूप अधिक परिपक्व झाल्या आहेत, असं प्रतिपादन रिझर्व्ह बँकेचे गवर्नर संजय मल्होत्रा यांनी केलं आहे. ते आज मुंबईत यावर्षीच्या, स्टेट बँक ऑफ इंडिया बँकिंग आणि इकॉनॉमिक्स परिषदेत बोलत होते. २०१८ मध्ये तोट्यात असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाचं आज शंभर अब्ज डॉलर्सच्या कंपनीत परिवर्तन झाल्याचं त्यांनी नमूद केलं. सरकारनं राबवलेल्या अनेक नियंत्रक मानकांमुळे देशाच्या बँकिंग क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचं त्यांनी सांगितलं.

****

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांचं आज मराठवाड्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आगमन झालं. आज सकाळी छत्रपती संभाजीनगर विमानतळावर माजी केंद्रीय राज्यमंत्री भागवत कराड यांनी त्यांचं स्वागत केलं. बीड जिल्ह्यातल्या शिरसाळा इथं खासगी शेतकरी प्रशिक्षण केंद्राला त्यांनी भेट दिली. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा ते आढावा घेणार आहेत.

****

आज राष्ट्रीय कर्करोग जागरूकता दिन आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या दिनानिमित्त दिलेल्या संदेशात, कर्करोगाबद्दल समाजात जागरूकता निर्माण करून कर्करोग समूळ नष्ट करू या, असं आवाहन केलं. तर, या रोगाबाबत जागरूकता

असली तर रोगनिदान लवकर होतं आणि या रोगाचा प्रतिकार योग्यरीतीनं करता येतो, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे.

****

पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. ते आज नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलत होते. या प्रकरणी उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली जावी, अशी मागणीही वडेट्टीवार यांनी केली.

****

भारतीय हॉकीच्या गौरवशाली शतकपूर्तीनिमित्त आजपासून देशभरात समारंभ होत आहेत. या महोत्सवात देशभरातल्या साडेपाचशे जिल्ह्यांमध्ये हॉकीचे चौदाशेहून अधिक सामने खेळवले जाणार आहेत.

****